जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय शहरी पुनरूत्थान अभियानांतर्गत "शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे" या उप कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबाबत.....

महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

शासन निर्णय क्रमांक- याचिका-२०१९ /प्र.क्र.६६/कराधान-१

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

दिनांक- १५-०६-२०१९

वाचा- शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग क्र. जनेयो- २००७/ प्र.क्र.५२/ गृनिधो-२, दिनांक २५ जून, २००७

प्रास्ताविक-

जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय शहरी पुनरूत्थान अभियानांतर्गत "शहरी गरीबांना मूलभूत सुविधा पुरविणे" हा उप- कार्यक्रम राबविण्याकरीता शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग क्र. जनेयो-२००७/ प्र.क्र. ५२/ गृनिधो-२, दिनांक २५ जून, २००७ (यापुढे याचा उल्लेख " गृहनिर्माण शासन निर्णय" असा करण्यात येईल) निर्गमित करण्यात आला आहे. गृहनिर्माण विभागाच्या शासन निर्णय परिच्छेद क्र. २६.२० विक्रीकराशी संबंधित आहे व तो खालीलप्रमाणे आहे-

"या उप-कार्यक्रमावरील मूल्यवर्धीत कराची आकारणी माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या संदर्भातील अधिसूचना वित्त विभागामार्फत स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येईल."

उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरीता वित्त विभागास निर्देशित करण्यात आले होते. तथापी मूल्यवर्धित कर कायद्यात योग्य त्या सुधारणा होऊ न शकल्यामुळे उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी झालेली नाही. तसेच, रामचंद्र भगवान देशमुख व इतर यांनी सदर विषयाच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठामध्ये रिट याचिका क्र. ७३०८/२०१८ दाखल केलेली आहे. त्यामुळे उपरोक्त परिस्थितीचा विचार करता गृहनिर्माण विभागाच्या उपरोक्त शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरीता शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय-

अ. सदर उप कार्यक्रमांतर्गत कार्यकंत्राटदाराने खरेदी केलेल्या मालावर दिलेल्या कराचा परतावा या शासन निर्णयातील अटी व शर्तींच्या अधिन राहून देण्यात यावा.

ब. व्यापाऱ्याने गृहनिर्माण शासन निर्णयांतर्गत केलेल्या विक्रीवरील कराचा भरणा स्वत: केला असेल व त्यासंदर्भात नियोक्तांनी कार्यकंत्राटाची देय रक्कम प्रदान करताना मूळ स्त्रोतांतून कराची रक्कम वजा केली असेल तर सदर रकमेचा परतावा देण्यात यावा.

क. उपरोक्त अ व ब अंतर्गत परतावा देताना व्यापाऱ्याने गृहनिर्माण शासन निर्णय उल्लेखीत विक्री व्यतिरिक्त केलेल्या इतर विक्रीवर येणारी करदेयता, अनुषंगिक व्याज, शास्ती व मूल्यवर्धित कर कायद्याखालील इतर थकबाकी प्रथम देय परताव्याच्या रकमेशी समायोजित करण्यात यावी व उर्वरित रकमेचा परतावा देण्यात यावा.

अटी-

१. महाराष्ट्र राज्यातील "शहरी गरीबांना मूलभूत सुविधा पुरविणे" या उप कार्यक्रमांतर्गत येणाऱ्या बृहन्मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर आणि नांदेड या शहरातील योजना परताव्याकरीता पात्र असतील.

२. शासन निर्णय क्रमांक जेनेयो-२००७/ प्र.क्र.५२/ गृनिधो-२, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२ दिनांक २५ जून २००७ नुसार केंद्रिय मंजुरी व संनियंत्रण समितीने मान्य केलेले प्रकल्पच फक्त परताव्यासाठी पात्र असतील.

३. असा खरेदी केलेला माल "शहरी गरीबांना मूलभूत सुविधा पुरविणे" या उप कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्रामध्येच वरील अट १ आणि २ मध्ये नमूद केलेल्या योजनांमध्येच वापरलेला असला पाहिजे.

४. अशा खरेदी केलेल्या मालाची फेरविक्री करता येणार नाही.

५. पुरवठादाराने दिलेल्या बीजकांमध्ये वेगळा गोळा केलेल्या कराचा मूल्यवर्धित कर कायद्याखालील नियमांतर्गत अनुज्ञेय वजावटींना अधिन राहून परतावा मिळेल. तथापी, भांडवली वस्तूवरील कराचा परतावा मिळणार नाही.

६. या शासन निर्णयानुसार विनिर्दिष्ट केलेल्या जोडपत्रानुसार खरेदी विवरण व नियोक्त्याने कपात केलेल्या TDS चे विवरण व्यापाऱ्याने नोडल अधिकाऱ्याकडे सादर करावे.

७. ज्याच्या आधारावर परताव्याची मागणी केली आहे अशा प्रत्येक खरेदी बीजकांची एक छायांकीत प्रत व TDS प्रमाणपत्राची मुळ प्रत विवरणांच्या पुष्ट्यर्थ सादर करतील. संबंधित नोडल अधिकारी अशा खरेदीवरील कराचा भरणा पुरवठादाराने शासकीय तिजोरीत केला आहे का, तसेच TDS प्रमाणपत्रानुसार नियोक्त्याने कर भरणा केला आहे का, हे तपासून परतावा अदा करेल.

८. जर जास्तीचा परतावा दिला गेला, तर कायद्याच्या तरतूदीनुसार तो वसूल करण्यात येईल.

९. या उप-कार्यक्रमांतर्गत परतावा देय असणाऱ्या व्यापाऱ्यांनी त्यांच्या नोडल अधिकाऱ्याकडे वरील अटींच्या अधिन राहून शासन निर्णय निर्गमित तारखेपासून ६ महिन्याच्या आत सोबत जोडलेल्या जोडपत्रासह अर्ज करावा.

१०. जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय शहरी पुनरूत्थान अभियानांतर्गत "शहरी गरीबांना मूलभूत सुविधा पुरविणे" या उप-कार्यक्रमांतर्गत कार्यकंत्राटदाराने खरेदी केलेल्या वस्तूंवरील कर ज्याचा भरणा पुरवठादाराने केलेला अशा रकमेचा व TDS वजातीच्या रकमेचा परतावा २०४०-००४२ या लेखाशीर्षातून अदा करण्यात येईल.

११. ज्या वस्तूंच्या खरेदीवर परतावा मागण्यात आलेला आहे अशा वस्तू जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय शहरी पुनरूत्थान अभियानांतर्गत "शहरी गरीबांना मूलभूत सुविधा पुरविणे" या उप-कार्यक्रमांतर्गत वापरण्यात आलेल्या आहेत याबाबत हमीपत्र देणे आवश्यक राहील.

ड. निर्धारणेअंती गृहनिर्माण शासन निर्णयांतर्गत येणारी निव्वळ करदेयता व त्यानुषंगिक व्याज व शास्ती शून्य निव्वळ भाराच्या पूरक मागणीद्वारे "२०४०- विक्री, व्यापार इत्यादीवरील कर (००) ००१ संचालन व प्रशासन -००(०१)- विक्रीकर आयुक्त - २०४०- ००४२ " उपलब्ध अंदाजपत्रकीय तरतूदीतून व्यापाऱ्याच्या वतीने ००४० विक्रीकर या लेखाशिर्षांतर्गत पुस्तकी समायोजनाद्वारे भरणा करावी.

ई. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २०१९०६१५१९२९०४३३०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAJIV JALOTA

Digitally signed by RAJIV JALOTA
DN: c=IN, o=STATE TAX OF MAHARASHTRA, postalCode=400006, st=Maharashtra, 2.5.4.20=2ea4aebdecd0cb8c3908b236f45b34b5e8995af8819aa928b6141f0b586d6901, serialNumber=62df6dd905fe9d5e9d5d8133a5f81afe592bd2df93aa0f4965113f36c671b75e, cn=RAJIV JALOTA
Date: 2019.06.15 19:13:03 +05'30'

(राजीव जलोटा)

शासनाचे अपर मुख्य सचिव

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई

२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई

३. मा. मंत्री (वित्त) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई

४. मा. राज्यमंत्री (वित्त) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई

५. वित्त विभाग, (व्यय-३ व अर्थोपाय कार्यासन), मंत्रालय, मुंबई

६. गृहनिर्माण विभाग (गृनिधो-२), मंत्रालय, मुंबई

७. राज्यकर आयुक्त, वस्तू व सेवा कर विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

८. प्रधान महालेखापाल, महाराष्ट्र -१, मुंबई (लेखा व अनुज्ञेयता)/ लेखा परीक्षा, मुंबई

९. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर (लेखा व अनुज्ञेयता)/ लेखा परीक्षा, नागपूर

१०. अधिदान व लेखा अधिकारी, मुबई

११. निवडनस्ती.

जोडपत्र-अ

खरेदी विवरण

अनुक्रमांक	पुरवठादाराचे नाव, पत्ता आणि टीन क्रमांक	बीजक क्रमांक आणि दिनांक	वस्तूचे नाव/ वस्तूंची नावे	खरेदीची रक्कम (रूपये)	
				निव्वळ किंमत	वेगळा आकारलेला कर
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)

जोडपत्र-ब

TDS विवरण

अनुक्रमांक	नियोक्त्याचे नाव, पत्ता आणि टीन क्रमांक	प्रमाणपत्र क्रमांक आणि दिनांक	कार्यकंत्राटाचा तपशिल	TDS वजातिच्या तपशिलाची रक्कम (रूपये)	
				देयक रक्कम	कराची रक्कम
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)